3 1 JUL 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांगीतिक कलाविष्कारांतून विद्यापीठात गुरूंप्रती कृतज्ञता

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध सांगीतिक व सांस्कृतिक कलाविष्कारांतून विद्यार्थ्यांनी गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ कल्चरल क्लबअंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात कार्यक्रम झाला.

या सोहळ्यात भरतनाट्यम नृत्यातून विद्यार्थ्यांनी 'श्लोकांजली' सादर केली आणि आई-वडील, शिक्षक गुरुजनांवर आधारित कथ्थक नृत्यही प्रस्तुत केले. 'गणेश वंदना', 'हरी म्हणा गोविंद म्हणा' या भक्तिगीतासह जिवलगा कधी रे येशील तू, धुंदी कळ्यांना, निगाहें मिलाने को जी चाहता है, चन्दन सा बदन, अशी हिंदी-मराठी गाणी सादर केली. राग यमनमधील बंदिशींचे सुरेल सादरीकरणही केले. त्यानंतर देवांग मराठे व प्रसाद सोनटक्के यांची बहारदार तबला जुगलबंदी रंगली. त्रिगुण पुजारी यांनी हार्मोनियम सोलो वादनाद्वारे राग मधुवंती, तर सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक हार्मोनिअम वादनाद्वारे राग मालकंस सादर केला. नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी गुरू-शिष्याच्या नात्यावर आधारित हृदयस्पर्शी नाटिका व व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेवर आधारित 'झेल्या' ही लघुनाटिका सादर केली. चित्रकलेच्या विद्यार्थ्यांनी विविध सांगीतिक वाद्यांच्या साथीसह सामूहिक पेंटिंगचे प्रात्यक्षिक दाखवून सर्वांची मने जिंकली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध सांगीतिक व सांस्कृतिक कार्यक्रमात गीत सादर करताना गायक विद्यार्थिनी.

उत्तरार्धात 'गुरू कृतज्ञता सोहळा' झाला. विक्रम परीट, संदेश गावंदे व ओंकार सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे संगीत संयोजन केले. मल्हार जोशी, विकास कांबळे यांनी तांत्रिक बाजू सांभाळली. अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी प्रास्ताविक केले. शिरीष कुलकर्णी व श्रुती खोचीकर यांनी सूत्रसंचालन केले.

3 1 JUL 2026

पुढारी



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात गायन, वादन, चित्रकला आदी विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. (छाया : नाज ट्रेनर)**

# शिवाजी विद्यापीठात सांस्कृतिक आविष्कारांतून गुरूप्रती कृतज्ञता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या कल्चरल क्लबअंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात विविध सांगीतिक व सांस्कृतिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांनी गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त केली. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या सोहळ्यात गायन, वादन, नृत्य, नाट्य आणि चित्रकलेचे बहुरंगी सादरीकरण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात भरतनाट्यममधील 'श्लोकांजली'ने झाली. त्यानंतर कथ्थक नृत्याद्वारे आई-वडील आणि गुरुजनांप्रती आदर व्यक्त करण्यात आला. 'गणेश वंदना', 'हरी म्हणा गोविंद म्हणा'सह मराठी-हिंदी गीतांचे तसेच राग यमनमधील बंदिशींचे सादरीकरण रसिकांना भावले. देवांग मराठे व प्रसाद सोनटक्के यांच्या तबला जुगलबंदीने रंगत आणली तर त्रिगुण पुजारी यांनी हार्मोनियमवर राग मधुवंती सादर केला. विद्यार्थ्यांनी सामूहिक हार्मोनियम वादनातून राग मालकंसही सादर केला. नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्य नात्यावर आधारित नाटिका आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'झेल्या' या कथेवर आधारित लघुनाटिका सादर केली.

चित्रकला विभागाच्या विद्यार्थ्यांनी सांगीतिक वाद्यांच्या साथीने सामूहिक पेंटिंगचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'गुरु कृतज्ञता' सोहळ्यात विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सत्कार करून आशीर्वाद घेतले. अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. शिरीष कुलकर्णी व श्रुती खोचीकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी आणि प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

3 1 JUL 2026 जनप्रवास जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# सांस्कृतिक आविष्कारांतून गुरुंप्रती कृतज्ञता

## शिवाजी विद्यापीठात बहारदार कार्यक्रम: 'झेल्या' लघुनाटिका सादर

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात गुरूपौर्णिमेनिमित्त विविध सांगितिक व सांस्कृतिक कलाविष्कारांतून विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ कल्चरल क्लब अंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून २९ जुलैरोजी विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा सोहळा अत्यंत मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला.

या सोहळ्यात भरतनाट्यम नृत्यातून विद्यार्थ्यांनी 'श्लोकांजली' सादर केली आणि आई-वडील, शिक्षक गुरुजनांवर आधारित कथ्थक नृत्यही प्रस्तुत केले. 'गणेश वंदना', 'हरी म्हणा गोविंद म्हणा' हे भक्तिगीत, जिवलगा कधी रे येशील तू, धुंदी कळ्यांना, निगाहें मिलाने को जी चाहता है, चन्दन सा बदन इत्यादी हिंदी-मराठी गाणी तसेच राग यमनमधील बंदिशींचे सुरेल सादरीकरण केले. देवांग मराठे आणि प्रसाद सोनटक्के यांची बहारदार तबला जुगलबंदी रंगली. त्रिगुण पुजारी यांनी हार्मोनियम सोलो वादनाद्वारे राग मधुवंती सादर केला. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक हार्मोनिअम वादनाद्वारे राग मालकंस सादर केला.

### हृदयस्पर्शी नाटिका

दरम्यान, नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्याच्या नात्यावर आधारित हृदयस्पर्शी नाटिका तसेच व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेवर आधारित 'झेल्या' ही लघुनाटिका सादर केली.

चित्रकलेच्या विद्यार्थ्यांनी विविध सांगीतिक वाद्यांच्या साथीसह सामूहिक पेंटिंगचे प्रात्यक्षिक दाखवून सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात गुरु कृतज्ञता सोहळा पार पडला. विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचा सत्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले. अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शिरीष कुलकर्णी व श्रुती खोचीकर यांनी सूत्रसंचालन केले. विक्रम परीट, संदेश गावंदे व ओंकार सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे संगीत संयोजन केले. मल्हार जोशी, विकास कांबळे यांनी तांत्रिक बाजू सांभाळली. कार्यक्रमाला अधिविभागाचे शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

3 1 JUL 2026
पुढारी

# झोटेरो विथ 'एआय'मुळे संशोधन अधिक स्मार्ट होईल : डॉ. पटेल

**कोल्हापूर :** शैक्षणिक संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व 'झोटेरो'सारख्या संदर्भ व्यवस्थापन साधनांचा प्रभावी वापर केल्यास संशोधन अचूक, व्यवस्थित व गुणवत्तापूर्ण होऊ शकते, असे प्रतिपादन गुजरात केंद्रीय विद्यापीठाचे सहायक ग्रंथपाल डॉ. भावेश पटेल यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग व बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'मीडिया अँड कम्युनिकेशन क्लब'च्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानप्रसंगी ते बोलयत होते. याप्रसंगी डॉ. पटेल यांनी 'झोटेरो' व एआय साधनांचा संशोधनात वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार होते. त्यांनी संशोधकांनी बदलत्या डिजिटल युगातील आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून संशोधन अधिक सक्षम करण्याचे आवाहन केले. प्रारंभी विभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वाय. जी. जाधव यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. शंका-निरसन सत्राचे संचालन डॉ. पी. बी. बिलावर यांनी केले. सूत्रसंचालन सुकेशानी कांबळे यांनी केले. प्रा. विनोद गुरव यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. शिवाजी जाधव, प्रा. निशा मुढे-पवार व प्रा. अक्षय सरवदे यांचे सहकार्य लाभले.